Please purchase PDFcamp Printer on http://www.verypdf.com/ to remove this watermark.

# प्राणी कल्याण शिबीरे अर्थात पशुधन व्यवस्थापन प्रात्यक्षिके आयोजित करणे

प्रस्तावना

पशुधन व्यवस्थापनातील विविध प्रात्यक्षिके पशुपालकांच्या सहयोगाने व सक्रिय सहभागाने आयोजित करून पशुधन व्यवस्थापनातील सहज अवलंब करण्यायोग्य व्यवस्थापन पध्दतींची माहिती करून देण्यासाठी एक दिवसीय शिबीराचे आयोजन करण्यात यावे. पशुधन व्यवस्थापन पध्दतींमध्ये लसीकरण, जंतनाशके पाजणे, वासरांच्या शिंगकळया कापणे, कृत्रिम रेतन करणे , गोचीड- गोमाशी निर्मूलन इ. पध्दती सहजपणे पशुपालकांना प्रात्यक्षिकांव्दारे दाखविणे शक्य आहे. अशा पशुधन व्यवस्थापन पध्दतीचा अवलंब करून प्रात्यक्षिके सादर केल्यामुळे कमी किंमतीत जास्तीत जास्त पशुपालकांपर्यत किफायतशिर पशुधन व्यवस्थापन पध्दतीचा प्रचार करणे शक्य आहे. प्रकल्प कालावधीत एकुण १८ प्रकल्प जिल्ह्यांतील गावांमध्ये अशा प्रकारच्या १५०० प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात यावे.

कार्यक्षेत्र

महाराष्ट्र कृषी स्पर्धाक्षम प्रकल्पांतर्गत निवडण्यात आलेल्या १८ जिल्हयांतील गावांमध्ये प्रकल्प कालावधीत एकूण १५०० प्रात्याक्षिकांचे आयोजन करण्यात यावे.

उपघटकाचे स्वरूप

पशुधन व्यवस्थापन पध्दतींची प्रात्यक्षिके ,अर्थात प्राणी कल्याण शिबीराचे आयोजन पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पंचायत समिती व पशुधन विकास अधिकारी पशुवैद्यकीय दवाखाना यांनी संयुक्तरित्या करावयाचे असून त्यांमध्ये विनिर्दिष्ट बाबींचा समावेश करण्यात यावा. गावाची निवड व प्रात्यक्षीक पध्दतीची निवड जिल्हास्तरीय निवड समितीकडून करण्यात यावी. प्रात्यक्षिकामध्ये गावातील सर्व पशुपालकाना सहभागी (किमान ५०) करावे. तसेच प्रात्यक्षिक घेण्याविषयीची ग्रामसंमती ग्रामपंचायतीकडून घेण्यात यावी व यानंतर प्रत्यक्ष प्रात्यक्षिक आयोजित करावे. यासाठी योग्य तो प्रसिध्दी व प्रचार करण्यात यावा. केलेल्या कामाचा तपशील केलेल्या कामाचा अहवाल सादर करावा या बाबीचा यथोचित अंतर्भाव करण्यात यावा.

या उपघटकाचा आराखडा संबंधित जिल्हा निवड समितीकडून अंतिमत: निश्चित करून घेऊन उपघटकाची अंमलबजावणी करण्यात यावी.

गाव निवडीचे निकष

पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पंचायत समिती व पशुधन विकास अधिकारी पशुवैद्यकीय दवाखना यांनी प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यासाठी गावाची निवड खालील निकषांवर करावयाची आहे.

१. गावातील जनावरांची संख्या किमान २०० एवढी असावी.

२. गावात डेअरी पशुसंवर्धन बचतगट कार्यरत असल्यास अशा गावाला प्राधान्य देण्यात यावे

३. गावातील पशुपालक सहभागशील असावेत व त्यांच्या संमतीनेच शिबीराचे आयोजन करावे.

उपघटकाचे अंदाजपत्रक

या उपघटकाच्या अंमलबजावणीसाठी निधी संबधित जिल्हयाच्या आत्मा यंत्रणेमार्फ त धनाकर्षाव्दारे /धनादेशाव्दारे जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांच्याकडे उपलब्ध होणार आहे. सदर प्रात्यक्षिक आयोजित करण्यासाठी प्रति प्रात्यक्षिक रूपये ३५००/- ची तरतूद आहे.

| | |
|---|---|
| प्रात्यक्षिक पध्दती साहित्य | रू. २०००/- |
| प्रात्यक्षिकाचे आयोजन प्रसिध्दी प्रचार | रू. १५००/- |
| एकुण | रू. ३५००/- |

Please purchase PDFcamp Printer on http://www.verypdf.com/ to remove this watermark.

प्रात्यक्षिकांसाठी लागणा-या साहित्य खरेदी जागतिक बॅकेच्या विहित संपादन पध्दतीचा अवलंब करुन व प्रादेशिक पशसंवर्धन सहआयुक्त/ सक्षम अधिकारी यांच्या तांत्रिक मान्यतेनुसार करण्यात यावा.

संनियत्रण

जिल्हा पातळीवर जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त हे या योजनेचे संनियत्रण करावे व तालुका पातळीवर पशुधन विस्तार अधिकारी पंचायत समिती व पशुधन विकास अधिकारी पशुवैद्यकीय दवाखाना हे क्षेत्रीय पशुसंवर्धन अधिकारी संयुक्तरित्या अधिनस्थ कर्मचा-यांसमवेत या उपघटकाची अंमलबजावणी करावी. सदर उपघटकांच्या अंमलबजावणीचा अहवाल परिशिष्ट १० प्रमाणे सादर करावा.

फलनिष्पत्ती

पशुसंवर्धन विषयक व्यवस्थापन पध्दतीचे प्रात्यक्षिकामुळे कमीत कमी निधीत जास्तीत जास्त पशुपालकांपर्यत उपयुक्त तंत्रज्ञानाचा माहीतीचा प्रसार होईल व त्याचा अंगिकार केला जाण्याची सुनिश्चिती होईल. नवीन प्रकारच्या प्रात्यक्षिक पध्दतीचा अवलंब ग्रामपातळीवर केल्यामुळे लोकांची सहभागशीलता वाढीस लागेल. यामुळे पशुधनजन्य सेवाचा मोठ्या प्रमाणावर प्रसार होईल. यामुळे पशुधन आरोग्य सुधारून पशुजन्य उत्पादनात वाढ होण्याची सुनिश्चिती होईल.

Please purchase PDFcamp Printer on http://www.verypdf.com/ to remove this watermark.

## प्राणी कल्याण शिबीरे, शिबीरांचे जिल्हावार भौतिक उद्दिष्टे

| अ. क्र. | मोठया जनावरांचे बाजार (गाय + म्हैस) | | एकुण भौतिक उद्दिष्ट | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | बाजाराचे नाव | जिल्हा | | | | | | |
| १ | चांदुर बाजार | अमरावती | ६२ | १७ | १५ | २० | २० | १० |
| २ | करंजा | वाशिम | ६२ | १७ | १५ | २० | २० | १० |
| ३ | पुसद | यवतमाळ | ६२ | १७ | १५ | २० | २० | १० |
| ४ | मेहकर | बुलढाणा | ६२ | १७ | १५ | २० | २० | १० |
| ५ | नेवासा | अहमदनगर | ६२ | १७ | १५ | २० | २० | १० |
| ६ | कर्जत (शेळी मेंढी बाजार) | अहमदनगर | ६२ | १७ | १५ | २० | २० | १० |
| | टप्पा १ एकूण | | ३७२ | १०२ | ९० | १२० | १२० | ६० |
| ७ | सावनेर | नागपुर | ६२ | ० | १० | २० | २० | १२ |
| ८ | लाखनी | भंडारा | ६२ | ० | १० | २० | २० | १२ |
| ९ | आमगाव | गोंदिया | ६५ | ० | १३ | २० | २० | १२ |
| १० | कडा | बीड | ६५ | ० | १३ | २० | २० | १२ |
| ११ | सांगोला | सोलापुर | ६२ | ० | १० | २० | २० | १२ |
| १२ | अकलुज | सोलापुर | ६२ | ० | १० | २० | २० | १२ |
| | टप्पा २ एकूण | | ३७८ | ० | ६६ | १२० | १५० | ७२ |
| १३ | पिंपळगाव बसवंत | नाशिक | ६५ | ० | ० | ० | ३२ | ३३ |
| १४ | पाचोरा | जळगाव | ६२ | ० | ० | ० | ३० | ३२ |
| १५ | अंमळनेर | जळगाव | ६२ | ० | ० | ० | ३० | ३२ |
| १६ | शिरपुर | धुळे | ६५ | ० | ० | ० | ३२ | ३३ |
| १७ | वसई | ठाणे | ६२ | ० | ० | ० | ३० | ३२ |
| १८ | खेड | पुणे | ६२ | ० | ० | ० | ३० | ३२ |
| १९ | लोणंद | सातारा | ६२ | ० | ० | ० | ३० | ३२ |
| २० | सांगली | सांगली | ६२ | ० | ० | ० | ३० | ३२ |
| २१ | वडगाव पेठ | कोल्हापुर | ६२ | ० | ० | ० | ३० | ३२ |
| २२ | आटपाडी (शेळी मेंढी बाजार) | सांगली | ६२ | ० | ० | ० | ३० | ३२ |
| २३ | दौंड (शेळी मेंढी बाजार) | पुणे | ६२ | ० | ० | ० | ३० | ३२ |
| २४ | दहीवडी (शेळी मेंढी बाजार) | सातारा | ६२ | ० | ० | ० | ३० | ३२ |
| | टप्पा ३ एकूण | | ७५० | ० | ० | ० | ३६४ | ३८६ |
| | एकुण | | १५०० | १०२ | १५६ | १८० | ५४४ | ५१८ |

Please purchase PDFcamp Printer on http://www.verypdf.com/ to remove this watermark.

## पशुधन आधार सेवा अंमलबजावणी संबंधी पर्यावरण व्यवस्थापन बाबत मार्गदर्शक सूचना

पशुपालन संबंधीत वाढते औद्योगिक घटक, चा-याच्या उपलब्धतेमध्ये होणारी घट, हवामानामध्ये होत असलेल्या बदलांबाबत जनावरांचे साधर्म्य इ. पर्यावरणावर होत असलेले परिणाम आहेत. त्यामुळे प्रकल्प- ESMF मध्ये पशुपालनाकरिता 'एकात्मिक किडरोग व्यवस्थापन' (IPM) आराखडा विकसित करण्यात आलेला आहे. प्रकल्पांतर्गत हाती घेतलेल्या एकात्मिक पर्यावरण विषयक व सामाजिक मुल्यांकन अभ्यास अहवाल (IESA), पर्यावरण व सामाजिक व्यवस्थापन आराखडा (ESMF) www.msamb.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

प्रकल्पात नुतनीकरणाकरीता निवड झालेल्या एका जनावरांच्या बाजारपेठेमध्ये प्रकल्प समन्वय कक्षातर्फे जनावरांची बाजारपेठ, पशुपालन व त्यामुळे पर्यावरणावर होणा-या परिणामांचा स्वतंत्र अभ्यास देखील करण्यात आला.

वरील अहवालांच्या अनुषंगाने प्रकल्प अंमलबजावणीमध्ये खालील ठळक बाबींचा अंतर्भाव करणे जरुरी आहे.

i. पशुसंवर्धनकरिता ATMA अंर्तगत होणार असणा-या प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये एकात्मिक कीडरोगव्यवस्थापन (Pest Surveillance) बाबत अंतर्भाव करण्यात यावा.

ii. बाजारपेठेत व प्रकल्पाच्या अंतर्गत येणा-या भागातील जनावरांचे स्वास्थ व आरोग्याबाबत पशुपालकांमध्ये जागरूकता निर्माण करावी व त्याची खात्री करावी.

iii. पशुपालकांना चारा व शेणखत (manure) च्या परिणामकारक व्यवस्थापनाबाबत जागरूक करावे व प्रोत्साहन द्यावे. जनावरांच्या विष्ठेची (manure) साठवणूक घन (वाळलेल्या) अवस्थेत करावी जेणेकरून वैश्विक तापमान वाढीस (Global Warming) कारणीभूत असलेल्या हरितगृह वायू (Green House Gases) मधील मिथेन (methane) या हानीकारक वायूचे प्रमाण कमी करण्यास मदत होईल.

iv. शेतक-यांना/पशुपालकांना पशुच्या खाद्यांमध्ये मका आणि सोया न देता अल्फा अल्फा व जवस यांचा अंतर्भाव करण्यास प्रोत्साहन द्यावे. त्यामुळे जनावरांच्या अन्न पचन क्रियेवर ताण येणार नाही व ढेकरचे प्रमाण कमी होईल. जेणेकरून ढेकर मधून मिथेन वायू बाहेर पडतो त्यास रोखण्यास मदत होईल.

v. शेतक-यांना सामुदायिक तत्वावर घनकचरा व्यवस्थापनाकरिता बायोगॅस सयंत्र उभारण्यास प्रोत्साहन द्यावे व त्याचे महत्व सांगावे. बायोगॅस सयंत्रामुळे हे शेतकरी उर्जानिर्मितीबाबत स्वयंपूर्ण होतील. याच बरोबर त्यांना या संयंत्रामधून उत्कृष्ट दर्जाचे खत देखील मिळेल. या खतामध्ये किटक नसतात व ते जमिनीची पोत आणि मातीचा कस वाढविण्याच्या दृष्टीने उपयोगी आहे.

vi. पशूधनाला आरोग्यदायी वातावरणात ठेवणे.

vii. किटकनाशकांचा सुरक्षित उपयोग व त्याच्या रिकाम्या झालेल्या भांड्यांची सुरक्षित विल्हेवाट लावणे तसेच निर्बंध आलेल्या किटकनाशकांबाबत जागृती करणे.

viii. जनावरांचे स्वास्थ्य शिबिरे तसेच लसीकरण इ. दरम्यान निर्माण होणाऱ्या Bio-Medical Waste चे व्यवस्थापन शासकीय निर्देशाप्रमाणे करावे.